


मुंबई : कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो-३ मार्गाचे आणखी चार डबे शुक्रवारी मुंबईत आले. यापूर्वी २ ऑगस्ट रोजी चार डबे आले होते. सारीपुत नगर येथील प्रकल्पस्थळी या डब्यांची जुळणी केली जाईल. त्यानंतर उभारण्यात आलेल्या तात्पुरत्या रॅम्पवर ट्रेनची चाचणी होईल. याच महिन्यात ही चाचणी होईल.